दै. गाववाला दि. 14/09/2022

# अखेर चाभरा येथील खूनाचा तपास लावण्यात मनाठा पोलीसांना यश

# मामा मुलगी देत नसल्याचा राग मनात धरून भाच्यानेच केला मामाचा खुन



अर्धापूर/गुणवंत विरकर

अर्धापूर तालुक्यातील चाभरा येथे शेतमजुराचा खून झाला होता सदर खुन हा चोरांनी केला अशीच चर्चा होती मात्र तो खुन नसून तो पूर्वनियोजित काहीतरी खुन्नस असल्याचा दावा मनाठा पोलीस करत होते चाभरा येथे ९ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा बालाजी दिगंबर काकडे ( वय ४५ ) या शेतमजुराचा कुऱ्हाडीचे घाव घालून खून झाल्याने परीसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

त्या दृष्टीने तपासाची चक्रे वेगाने फिरवून सहायक पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी खून प्रकरणाचा अखेर छडा लावला व तपास करून आरोपी नामे एकनाथ बंडू जाधव व १९ वर्ष धंदा मजुरी राहणार चाभरा यास अटक करून दि १३ रोजी माननीय न्यायालय हादगाव येथे हजर केले. सदर आरोपीला न्यायालयात हजर केले असता दिनांक १६/०९/२०२२ रोजी पर्यंत पोलिस कस्टडी देण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील आरोपी हा मयताचा भाचा असून मयताची मुलीची लग्नासाठी मागणी करत होता परंतु मामा बालाजी काकडे यांनी आरोपी एकनाथ बंडू जाधव यास तुझ्याकडे काहीही नाही, तू मजुरी करतोस माझी मुलगी शिकलेली आहे मला चांगल्यां घरी द्यायची आहे असा स्पष्ट वारंवार नकार दिल्याने त्याचा राग धरून आरोपीने मयत इसम झोपलेला असताना कुऱ्हाडीने डोक्यात चाळ्यावर मानेवर व कानावर सपासप वार करून जीवे ठार मारून खून केलेला आहे.खुनाच्या अज्ञात आरोपीचा तात्काळ शोध घेऊन आरोपीला अटक करून गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक चित्तेवार ए.एस.आय मधुकर पवार, ए.एस.आय देशमुख, पोलीस हवालदार दत्तात्रय गिरी ,पोलीस हवालदार दत्तात्रय वडजे ,पोलीस नाईक बालाजी रावले ,पोलीस नाईक कृष्णा यादव ,पोलीस नाईक सखाराम वागतकर ,पोलीस कॉन्स्टेबल चालक संभाजी नरवाडे ,पोलीस कॉन्स्टेबल आनंदा वाघमारे आदींनी परिश्रम घेतले.

गोदातीर समाचार 14/09/2022

# माहूरमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे लावल्याप्रकरणी ४८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड-** श्री गणेश विसर्जन मिरवणुकीला डीजे न लावता व शासनाच्या आदेशाचे उल्लंघन न करता मिरवणूक काढाव्यात अशा सूचना दिल्या होत्या. यानंतरही माहूर येथील श्री गणेश मंडळाने डीजे लावला. या प्रकरणी माहूर पोलीस ठाण्यात तब्बल ४८ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी डीजे आणि वाहन जप्त केले आहे.

माहूर शहरात एका गणेश

राज्य शासनाने जारी केलेल्या ध्वन-प्रदूषण नियमावलीचे उल्लंघन करून तसेच नांदेड जिल्हाधिकारी आणि पोलिसांच्या आदेशाची पायमल्ली करत कर्ण कर्कश आवाजात साऊंड सिस्टिम लावून नियमांचे उल्लंघन केले. याप्रकरणी माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार गजानन इंगळे यांच्या फिर्यादीवरून कलम १८८ भादविसह कलम १३४, १३५, १३६ महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

... योगेश

रघुनाथ दुधे, योगेश रेणुकादास दातीर सर्व राहणार माहूर, डीजे चालक रोशन विलास पर्वत (रा. गजानन नगर यवतमाळ), महेश श्रावण आडे, गजानन दत्तात्रेय डहाळे, प्रताप दुर्गासिंग चंदेल, अविनाश माणिक भुमारे, राहुल श्रीकृष्ण राऊत सर्व राहणार माहूर, डीजे चालक बलामा कृष्णा राहणार आदीलाबाद आंध्र प्रदेश, अति शंकर राठोड, करण रेणुकादास चव्हाण, पवन दगडू राठोड, जुगल मुकिंदा चव्हाण सर्व राहणार माहूर, **(पान ६ वर...)**